SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
# WOMEN'S UNIVERSITY
1, Nathibai Thackersey Road, Churchgate, Mumbai - 400 020.
Telegram : UNIWOMEN • Telephone : 2203 1879 • Fax : 2201 8226
Website : www.sndt.ac.in

Ref. No.

Ac/Finance/2014-15/65

May 6, 2014

**CIRCULAR**

To,

1. All Principals of the Colleges conducted by SNDT Women's University.
2. All Directors/Heads/Coordinators/In-charge of the SNDT Women's University Departments at Churchgate, Juhu & Pune Campuses.

Sir/Madam,

Please refer to Government Resolution No. 1009/67/SER-5 dated 24th August, 2009 regarding revision of rates of HRA and continuation of payment of CLA to the state government employees and others, which is attached herewith along with 'Annexure II' of old GR No. 1287/943/SER-10. You are requested to bring the content of the GR to the notice of all teaching and non-teaching employees and ensure that **'Annexure II'** of old GR is duly filled up by all the employees and sent to this office **on or before 30th May, 2014** failing which the salary for the month of May, 2014 will not be released.

**M. S. Kumar**
**(Finance & Accounts Officer)**

Copy submitted to:-

1. Hon. Vice-Chancellor, S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.
2. Hon. Pro.Vice-Chancellor, S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.

Copy for information:-

1. The Registrar, S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.
2. The Director, B.C.U.D., S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.
3. The Controller of Examination, S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.
4. The University Librarian, S.N.D.T. Women's University, Mumbai – 400 020.

Copy for Finance & Accounts Section record:-

1. Finance & Accounts Section – Standing Order File.

राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना सुधारित दराने घरभाडेभत्ता मंजूर करणे आणि विद्यमान दराने स्थानिकपूरकभत्त्याचे प्रदान चालू ठेवण्याविषयी.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- घभाभ - १००९/प्र.क्र.६७/सेवा -५,
दिनांक :- २४ ऑगस्ट,२००९

पहा :- (१) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक वेपुर-१२८७/६४३/सेवा -१०, दिनांक २५ एप्रिल,१९८८

(२) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक घभाभ - १०९८/प्र.क्र.८२/९८ /सेवा -५, दिनांक ११ डिसेंबर १९९८

(३) शासन शुध्दिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक घभाभ - १०९८/प्र.क्र.८२/९८/सेवा -५, दिनांक ५ जानेवारी १९९९

(४) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक घभाभ - १००५/प्र.क्र.१३ /सेवा -५, दिनांक १७ जून २००५

(५) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २(१३) / २००८- ई. II(बी), दिनांक २९ ऑगस्ट,२००८.

(६) केंद्र शासन, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक २(१३) / २००८- ई. II(बी), दिनांक ७ जानेवारी, २००९

(७) शासन निर्णय,वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण - १००९/प्र.क्र.४०/सेवा -५, दिनांक १३ मे २००९

प्रस्तावना:- सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने केंद्रिय कर्मचाऱ्यांना लागू केलेल्या वेतन संरचनेच्या धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम,२००९ अन्वये सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आली आहे.ही सुधारित वेतन संरचना लागू करताना, वरील (७) येथील दिनांक १३ मे २००९ च्या आदेशान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता व स्थानिक पुरक भत्ता हे भत्ते त्यांच्या असुधारित वेतनश्रेणीतील वेतन ,

त्यावरील महागाई वेतन आणि सदर भत्त्यांचे विद्यमान(existing) दर लक्षात घेऊन मंजूर करण्यात आले आहेत.

सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने केंद्रिय कर्मचाऱ्यांना घरभाडे भत्ता मंजूर करण्याच्या प्रयोजनार्थ, शहरांच्या /गावांच्या वर्गीकरणात आणि घरभाडे भत्त्याच्या दरांत वरील (५) येथील दिनांक २९ ऑगस्ट, २००८ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे. ही सुधारणा करताना केंद्र शासनाने शहराच्या नागरी समुह क्षेत्राची लोकसंख्या विचारात घेतली आहे. त्याच धर्तीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना व इतरांना लागू असलेल्या घरभाडे भत्त्याच्या विद्यमान दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

## शासन निर्णय

शासन आता असे आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना घरभाडे भत्ता मंजूर करण्यासाठी खालील तक्त्यातील स्तंभ २ मधील शहरांचे / गावांचे विद्यमान वर्गीकरण स्तंभ ४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात यावे आणि सुधारित वर्गीकरणानुसार शहरांना /गावांना त्यांच्यासमोर स्तंभ ५ मध्ये दर्शविलेल्या सुधारित दराने घरभाडेभत्ता मंजूर करण्यात यावा.

हे आदेश दिनांक १ ऑगस्ट.२००९ पासून अंमलात येतील.

| अ.क्र. | शहरांचे /गावांचे विद्यमान वर्गीकरण | घरभाडेभत्त्याचे विद्यमान दर (मूळ वेतन आणि महागाई वेतनाच्या बेरजेची टक्केवारी) | शहरांचे /गावांचे सुधारित वर्गीकरण | घरभाडेभत्त्याचे सुधारित दर (मूळ वेतनाची टक्केवारी ) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अ-१ | ३० टक्के | एक्स | ३० टक्के |
| २ | अ, ब-१, आणि ब-२ | १५ टक्के | वाय | २० टक्के |
| ३ | क | ७.५ टक्के | झेड | १० टक्के |
| ४ | अवर्गीकृत | ५ टक्के | | |

राज्यातील शहरांच्या/गावांच्या सुधारित वर्गीकरणाची यादी या शासन निर्णयासोबतच्या जोडपत्र -१ प्रमाणे राहील.

२. सुधारित दराने घरभाडे भत्त्याची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ मूळ वेतनात विहित वेतन बॅन्ड मधील आहरित करीत असलेले वेतन आणि अनुज्ञेय ग्रेड वेतनाचा समावेश होईल. मात्र त्यामध्ये " विशेष वेतन" इत्यादी सारख्या वेतनाचा समावेश नसेल. उच्च प्रशासकीय श्रेणी +( एचएजी + ) वेतनश्रेणीतील शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मूळ वेतन म्हणजे विहित श्रेणीतील वेतन असेल.

परंतु,जे कर्मचारी असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेतील, त्यांच्या बाबतीत घरभाडे भत्त्याची परिगणना त्यांचे असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन, कुंठीत वेतनवाढी आणि महागाई वेतन लक्षात घेऊन करण्यात येईल.

३. शासन असेही आदेश देत आहे की, राज्य शासकीय कर्मचारी व इतरांना स्थानिक पूरक भत्ता हा, ते जणू काही असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत असे मानून त्यांच्या असुधारित वेतनावर आणि संदर्भ क्र. (२) येथील दिनांक ११ डिसेंबर,१९९८ च्या आदेशान्वये विहित केलेल्या दराने व संदर्भ क्र.(४) येथील १७ जून २००५ च्या आदेशातील तरतूदीनुसार विहित केलेले शहरांचे / गावांचे वर्गीकरण लक्षात घेऊन मंजूर करण्याची संदर्भ क्र. (७) येथील दिनांक १३ मे,२००९ च्या आदेशांतील तरतूद यापुढेही चालू राहील.

४. संदर्भ क्र.(४) येथील दिनांक १७ जून,२००५ च्या आदेशातील परि.३ मधील विद्यमान वर्गीकरणाच्या तुलनेत निम्न वर्गीकरण प्राप्त झालेल्या शहरांचे व गावांचे विद्यमान वर्गीकरण कायम ठेवण्याबाबतच्या तरतूदी यापूढेही चालू राहतील. या तरतुदीन्वये, नवी मुंबई ( सी.टी.) [ म्हणजे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्राबाहेरील नवी मुंबईचा भाग] येथे विद्यमान (अ-१) वर्गीकरणानुसार सुधारित "एक्स" वर्गीकृत शहरी लागू असलेल्या दराने तसेच, कामठी नागरी समूहातील कामठी (नगरपालिका) आणि कामठी (छावणी ) येथे विद्यमान ( ब - १ ) वर्गीकरणानुसार सुधारित "वाय" वर्गीकृत शहरी लागू असलेल्या दराने घरभाडे भत्ता आणि स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय ठरेल.

५. स्थानिक पूरकभत्ता व घरभाडे भत्त्याच्या अनुज्ञेयतेसंबंधीच्या विद्यमान आदेशातील इतर सर्व तरतूदी व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

६. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत या आदेशाच्या परिणामी होणारा घरभाडे भत्त्यावरील वाढीव खर्च हा त्यांचे वेतन व भत्ते या संबंधीचा खर्च ज्या संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतो त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीतील खर्च संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखाली ज्या उपलेखाशीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उपलेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

सर्व विभागप्रमुख, सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि कृषि व कृषितर विद्यापीठांचे कुलसचिव यांनी या बाबत होणारा जादा खर्च सुधारित अंदाजपत्रक तयार करताना विचारात घ्यावा.

७. हे आदेश शासनाच्या या *www.maharashtra.gov.in* या वेबसाईटवर उपलब्ध असून त्यांचा संगणक संकेतांक २००९०८२४१४३००७००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शि.म.म्हात्रे )
शासनाचे उप सचिव

प्रति,

महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनीट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
राज्यपालांचे सचिव.
मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव.
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक.
मंत्रालयीन सर्व विभाग.
सर्व विभागीय आयुक्त.
मंत्रालयाच्या सर्व विभागांखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सहसंचालक, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, मुंबई.
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
नगरविकास विभाग, चूडी-१० मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (२० प्रती)
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशोब, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/अमरावती
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशोब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर,
जिल्हा लेखापरीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशोब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे (२५ प्रती)
कला संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई (४० प्रती)
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (१०० प्रती)
# सचिव राज्य माहिती आयोग
संचालक, तांत्रिक प्रशिक्षण, द्वारा-तंत्र शिक्षण संचालक, मुंबई (२५० प्रती)
सर्व विभागीय शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक (प्रत्येकी १० प्रती)
सर्व जिल्हा परिषदांचे शिक्षणाधिकारी
आयुक्त, महानगरपालिका, नागपूर.
प्रशासकीय अधिकारी, पश्चिम महाराष्ट्रातील नगरपालिका शिक्षण मंडळे (पुणे/कोल्हापूर/सोलापूर या महानगरपालिकांची शिक्षण मंडळे यांसह) मुख्य अधिकारी, सर्व नगरपालिका
कार्यकारी अधिकारी, कॅन्टोनमेंट बोर्ड, खडकी /देहू रोड/ देवळाली /अहमदनगर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक (१० प्रती)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे (१० प्रती)
संचालक, आदिवासी संशोधन व शिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
आदिवासी विकास आयुक्त, नाशिक.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
अपर आयुक्त, आदिवासी उपयोजना, नाशिक/नागपूर.
सर्व समाजकल्याण अधिकारी, वर्ग-१
सर्व आदिवासी कल्याण अधिकारी
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिकृत आदिवासी विकास प्रकल्प
कुलसचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
कुलसचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
कुलसचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला
कुलसचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे
कुलसचिव, नागपूर विद्यापीठ, नागपूर
कुलसचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
कुलसचिव, अमरावती विद्यापीठ, अमरावती
कुलसचिव, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई
कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव
अधीक्षक, वेतन पथक, सर्व जिल्हे.
शिक्षण निरीक्षक, बृहन्मुंबई (उत्तर, दक्षिण व पश्चिम विभाग)
सर्व कन्याशाळा निरीक्षिका
सर्व जिल्ह्यांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
सर्व प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग-सेवा-५.

# पत्राने
एच-१४४६-२अ

शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक :- घभाभ - १००९/प्र.क्र.६७/सेवा -५,
दिनांक २४ ऑगस्ट,२००९ चे सहपत्र

जोडपत्र - १

घरभाडेभत्ता मंजुरीसाठी राज्यातील शहरांचे /गावांचे सुधारित वर्गीकरण

| एक्स वर्ग शहरे | वाय वर्ग शहरे |
|---|---|
| मुंबई ( नागरी समुह ) | पुणे (नागरी समुह ),<br>नागपूर ( नागरी समुह),<br>नाशिक (नागरी समुह ),<br>अमरावती महानगरपालिका,<br>औरंगाबाद (नागरी समुह),<br>भिवंडी (नागरी समुह ),<br>सोलापूर (नागरी समुह ),<br>कोल्हापूर (नागरी समुह ) |

टीप- राज्यातील जी अन्य शहरे /गावे एक्स किंवा वाय वर्गात समाविष्ट नाहीत,त्यांचा समावेश झेड वर्गात होतो.

-------

एच-१४४६[ ८०००+ ५०-८-०९]-३०

Accompaniment to Government Resolution, Finance Department, No. RPS. 1287/643/ SER-10, dated 25th April 1988

## ANNEXURE II

**Certificate to be furnished by a Government servant for drawal of House Rent Allowance in the month of April each year or whenever there is a change in the contents of the certificate.**

**I certify that—**

1. I have not been provided with Government accommodation during the period in respect of which the allowance is claimed.
2. I am residing in a rental house as a tenant/sub-tenant in a house rented by............. .......................from...................to....................and I am incurring some expenditure/contributing towards rent.
3. My wife/husband has not been allotted family accommodation at the same station by Central Government/Public Undertaking/Semi-Government Organisation such as Municipality, Port Trust, etc.
4. The accommodation for which house rent allowance has been claimed by me is not being used for other than *bonafide* residential purpose.
5. I am residing in a house owned by me/my wife/son/daughter/father/mother from........ ...........to ...................and paying/contributing towards the municipal and other taxes.
6. I am residing in a flat/house in the ............................ Co-operative Housing Society from ...................and paying/contributing towards the Municipal and other taxes. No portion has been leased/A portion has been leased to ..................... with effect from...................for which an income of Rs. ............... per month is derived by the Society. The said income is not apportioned between the members and there is no direct pecuniary nexus between the member and the income/The said income is apportioned between the members but my share is not more than the expenditure which I incur on payment of municipal and other taxes.

Date:

Signature ..............................

Name ................................

Designation ...........................

Department/Office - .......................

*N.B.*—Strike out whichever is not applicable.